# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)


## प्रेस नोट

### महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास राष्ट्रीय जल पुरस्कार

राष्ट्रीय जल पुरस्कार - २०१८ वितरण सोहळा दिनांक २५ फेब्रुवारी २०१९ सोमवार रोजी नवी दिल्ली येथील कॉन्स्टीटयुशनल क्लब येथे मा. नितीनजी गडकरी, मंत्री, जलसंसाधन, नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

सदर पुरस्कार वितरण सोहळयास मा. अर्जुन राम मेघवाल, राज्यमंत्री, जलसंसाधन, भारत सरकार, मा. गिरीषजी महाजन, मंत्री, जलसंपदा, मा. राम शिंदे, मंत्री, जलसंधारण, मा. संभाजी पाटील-निलंगेकर हे महाराष्ट्राचे मंत्री उपस्थित होते.

"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण" या महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त व वैधानिक प्राधिकरणास केंद्र सरकारकडून जल नियमन क्षेत्रातील "सर्वोत्कृष्ट नियमन प्राधिकरणाचा " राष्ट्रीय पुरस्कार श्री. नितीनजी गडकरी, मंत्री, जलसंसाधन, नदी विकास व गंगा संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या वतीने अध्यक्ष श्री. के.पी. बक्षी, सदस्य ( अभियांत्रिकी) श्री. विनय कुलकर्णी, सदस्य (विधी) ॲड विनोद तिवारी, व सदस्य (अर्थ) डॉ. एस.टी. सांगळे यांनी पुरस्कार स्वीकारला.

राज्यातील उपलब्ध जलसंपत्तीचे न्यायोचित, समन्यायी व टिकाऊ वितरण व व्यवस्थापन यासाठी "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा, २००५" अन्वये महाराष्ट्रात जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन झालेले आहे. राज्यातील भू-पृष्ठावरील उपलब्ध जलसंपत्तीचे तसेच भू-जलाचे हे प्राधिकरण नियमन करते. प्राधिकरणाने स्वायत्तपणे जनहितार्थ घेतलेले निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीने जलक्षेत्रात झालेला सकारात्मक परिणाम, अधिनियमाने विहित केलेल्या जबाबदा-यांची अंमलबजावणी, पाण्याचा काटेकोर वापर, जल प्रदूषणावर नियंत्रण, सांडपाण्याचा पुनर्वापर यासाठी केलेली जनजागृती यांचा सर्वंकष विचार करुन केंद्र शासनाने देशातील " सर्वोत्कृष्ट जल नियमन प्राधिकरण" या संवर्गातील प्रथम पुरस्कारासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची निवड केली आहे.

M.W.R.R.A. MUMBAI

प्राधिकरणाने विविध क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य जलक्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणत असून पाण्याचा काटकसरीने वापर, पुर्नउपयोग, सांडपाणी व्यवस्थापन व जलपूनर्भरण या क्षेत्रात महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे.

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने पाण्याच्या अधिकाराला जीवन जगण्याचा मूलभूत – मौलिक अधिकार म्हणून संवैधानिक मान्यता असल्याचे स्पष्ट केल्यानंतर महाराष्ट्रातील प्राधिकरणाने वेळोवेळी महत्वपूर्ण आदेश पारीत केले आहेत.

जलसंपत्ती नियमन क्षेत्रात, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या पुढील उल्लेखनीय कामांची विशेष दखल घेतलेली आहे :

- विविध पाणी वापरकर्ते, अशासकीय संस्था, जलक्षेत्रातील तज्ञ यांचेशी सततचा विचारविनिमय करुन प्राधिकरणाने घेतलेले पारदर्शी व जनहिताचे निर्णय.
- प्राधिकरणाकडे येणाऱ्या पाणी तंट्यांचा केलेला न्यायिक व जलदगतीने निपटारा. त्यामुळे पाणी वापरकर्त्यांमध्ये प्राधिकरण कामाबाबत निर्माण झालेले विश्वासाचे वातावरण.
- प्राधिकरणाने सिंचन व बिगर सिंचन पाणीहक्क वितरणासाठी तयार केलेले निकष व त्याची प्रभावी अंमलबजावणी.
- पाणी वापरकर्त्यांची आर्थिक क्षमता, पाणी उपलब्धतेची शाश्वती व पाणी वापरकर्त्याकडून होणारे प्रदूषण या घटकांच्याआधारे प्राधिकरणाने तयार केलेले पाणीपट्टीचे दर.
- पाणी वापराच्या प्रमाणात तयार केलेले घरगुती व औद्योगीक पाणीपट्टीचे दर.
- पाणी नाश थांबविणे व पाण्याचा कार्यक्षम वापर यासाठी तयार केलेले विविध नियम, यासाठीच्या प्रोत्साहनात्मक व दंडनीय तरतुदी व त्याची काटेकार अंमलबजावणी.
- नागरी सांडपाण्यावर प्रक्रिया व त्याच्या पुनर्वापरासाठी घेतलेली आग्रही भूमिका.
- उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटपासाठी दिलेले विविध आदेश.

M.W.R.R.A. MUMBAI

27/02/2018

ॲड विनोद तिवारी
सदस्य (विधी)